दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक ३२८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.२१ फेब्रुवारी २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## मुंबईत पुन्हा वाढतोय कोरोनाचा धोका, ७१,८३८ कुटुंब असलेल्या १३०५ इमारती सील!

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत पुन्हा एकदा कोरोनाचा धोका वाढला आहे. येथे पुन्हा एका कोरोना व्हायरस वेगाने पसरायला सुरुवात झाली आहे. यामुळेच आता बृहन्मुंबई महानगरपालिकेने (बीएमसी) एक हजारहून अधिक इमारती सील केल्या आहेत. महानगरपालिकेने मुंबईतील तब्बल १३०५ इमारती सील केल्या आहेत. या इमारतींमध्ये ७१,८३८ कुटुंब राहतात. मुंबईमध्ये २,७४९ कोरोनाबाधित आढळून आल्यानंतर बीएमसीने हे पाऊल उचलले आहे. महाराष्ट्रात तीन महिन्यांनंतर पहिल्यांदाच शुक्रवारी कोरोनाचे तब्बल ६,११२ नवे कोरोनाबाधित समोर आले. यातील अधिकांश कोरोनाबाधित अकोला, पुणे आणि मुंबई भागातील आहेत. यापूर्वी ३० ऑक्टोबरला महाराष्ट्रात एका दिवसात ६,००० हून अधिक कोरोनाबाधित आढळले होते. यानंतर कोरोनाबाधितांची संख्या कमी होण्यास सुरुवात झाली होती.

# आंतरराष्ट्रीय गोल्फ कोर्स नवी मुंबईचे भूषण ठरेल : ना.एकनाथ शिंदे

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

नवी मुंबईमध्ये साकारण्यात येत असलेल्या अन्य आंतरराष्ट्रीय प्रकल्पांबरोबरच विस्तारित १८ होल्सचे आंतरराष्ट्रीय गोल्फ कोर्सही नवी मुंबईचे भूषण ठरेल, याबाबत कोणतीही शंका नाही, असे उद्गार एकनाथ शिंदे, मंत्री, नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांनी काढले. सिडको मास्टर्स कप - २०२१ गोल्फ सामन्याचे उद्घाटन आणि ०९ होल्सच्या खारघर व्हॅली गोल्फ कोर्सचा १८ होल्सच्या गोल्फ कोर्समध्ये विस्तार आणि आधुनिक सुविधांसह कंट्री क्लब विकसित करण्याच्या आराखड्यांचे अनावरण करतेवेळी त्यांनी हे उद्गार काढले. सामाजिक अंतरासह कोविड-१९ सुरक्षाविषयक नियमांचे पालन करून हा कार्यक्रम पार पडला.



या प्रसंगी हेमंत नगराळे, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, बिपिनकुमार सिंग, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, डॉ. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, सुप्रसिद्ध टेनिसपटू लिएंडर पेस आणि सिडकोतील विभाग प्रमुख हेही उपस्थित होते. एकनाथ शिंदे यांनी या वेळी बोलताना सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेले आंतरराष्ट्रीय विमानतळ, नैना, कॉर्पोरेट पार्क आणि विस्तारित गोल्फ कोर्स हे राज्याच्याच नव्हे तर देशाच्या नगर विकास क्षेत्राला नवीन दिशा देणारे ठरून, राज्याच्या व देशाच्या आर्थिक विकासातही मोलाचे योगदान देणारे ठरतील, असे प्रतिपादन केले.

डॉ. संजय मुखर्जी यांनी १८ होल्सचे गोल्फ कोर्स तसेच कॉर्पोरेट पार्क प्रकल्पा अंतर्गत विश्वचषक फुटबॉल आणि इतर आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी साकारण्यात येणाऱ्या सेंटर ऑफ एक्सलन्समुळे खारघर नोड भविष्यात 'स्पोर्टस हब' म्हणूनही उदयाला येणार आहे. गोल्फ कोर्स हे नवी मुंबईतील एक आयकॉनिक स्थळ बनणार आहे , असा विश्वास व्यक्त केला. खारघर हा नवी मुंबईतील सर्वांत विस्तीर्ण नोड असून नजीकच्या काळात खारघर व परिसरात आंतरराष्ट्रीय विमानतळ, एरो सिटी, परिवहन केंद्रित गृहनिर्माण योजना, मेट्रो रेल्वे, आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्क, मेडी सिटी, सेंटर फॉर एक्सलन्स, खारघर हिल्स प्लेट्यु असे महत्त्वाचे प्रकल्प साकार होणार असल्याने हा नोड निवासी, वाणिज्यिक, परिवहन व सांस्कृतिक सुविधांनी परिपूर्ण असणार आहे.

गोल्फसारख्या प्रतिष्ठीत खेळाचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे सामने आयोजित करून राज्याच्या व देशाच्या पर्यटनास चालना देण्याच्या उद्देशाने सिडकोतर्फे खारघर नोडमध्ये ५२ हेक्टरवर खारघर व्हॅली गोल्फ कोर्स मैदान विकसित करण्यात आले आहे. विस्तीर्ण हिरवीगार जमीन, पार्श्वभूमीला खारघर परिसरातील हिरवाईने नटलेल्या डोंगररांगा आणि या डोंगररांगांवरून वाहत येणारे लहानमोठे जलप्रपात, या निसर्गसौंदर्याचा कल्पकतेने वापर करून खारघर येथील गोल्फ कोर्स मैदान विकसित करण्यात आले आहे. गोल्फ कोर्समध्ये सिडकोचा मॅग्नम-ओपस गोल्फ व कंट्री क्लब, ७२ पार व ७,१३७ यार्डचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ९ होल्सचे गोल्फ कोर्स यांचा समावेश होतो.

लवकरच ९ होल्सच्या गोल्फ कोर्सचा १८ होल्सच्या गोल्फ कोर्समध्ये विस्तार करण्यात येणार असून त्याचबरोबर क्लब हाउससह पूर नियंत्रणासाठी डिटेन्शन पॉन्ड, निवासी वापरासाठी आलीशान व्हीला, पंचतारांकित उपहारगृह, निवासी वापरासाठी अपार्टमेन्ट/बंगले या सुविधाही विकसित करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी, सिडको यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. कैलास शिंदे यांनी केले.

## संक्षिप्त...

### १३,५९२ विनामास्क फिरणाऱ्यांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोना रुग्ण संख्येत अशीच वाढ होत राहिल्यास लॉकडाऊन करण्याची वेळ येईल, अशी चेतावनी महापालिका प्रशासन वारंवार देत आहे. मात्र दंड, पोलिसांचा दंडुका आणि जीवाची भीती घालूनही काही मुंबईकरांना अद्याप शहाणपण सुचलेले नाही.

सार्वजनिक ठिकाणी तोंडाला मास्क न लावता आपल्या बरोबरच अन्य लोकांचे जीवही धोक्यात घालणाऱ्या तब्बल १३ हजार ५९२ बेफिकीर लोकांवर गेल्या २४ तासांमध्ये कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून पालिकेच्या पथकाने २७ लाख १८ हजार ४०० रुपये दंड वसूल केला.

लोकल सेवा ठरविक वेळेत सर्वांसाठी सुरू केल्यानंतर रेल्वे स्थानक. व गाड्यांमध्ये गर्दी वाढली. परिणामी, बाधित रुग्णांची दररोजची संख्या एक हजारांपर्यंत पोहोचली आहे.

कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी लोकांनी तोंडाला मास्क लावणे अनिवार्य आहे. बहुतांशी लोकं मास्क चुकीच्या पद्धतीने अथवा लावतच नसल्याने दिसून येत आहे. सार्वजनिक ठिकाणी मास्क नाही तर प्रवेश नाही, असा नियम करण्यात आला आहे. मात्र बाजारपेठ, रिक्षा, टॅक्सी, विशेषतः रेल्वेमध्ये प्रवास करताना प्रवाशी मास्क काढून ठेवत आहेत. त्यामुळे कोरोनाचा धोका वाढला आहे.

## पनवेल रायगडचा पाणीप्रश्न मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्री पनवेल दौऱ्यावर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड व पनवेल चा पाणी प्रश्न मागील दहा वर्षापासून सातत्याने तापलेला आहे. दरवर्षी फेब्रुवारी ते जून पर्यंत पनवेल महानगरपालिकेतील व सिडको मधील जनतेला नागरिकांना पाण्यासाठी दाही दिशा वणवण करावी लागते. पनवेलच्या पाणीप्रश्ना वरून फक्त राजकारणच सुरू असल्याने शिवसेनेने पुढाकार घेऊन पनवेल चा पाणी प्रश्न मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना साकडे घातले होते.



ज्येष्ठ शिवसैनिक व सामाजिक कार्यकर्ते विष्णू गवळी हे मागील दहा वर्षापासून सिडको राज्य सरकार जिल्हा परिषद व संबंधित सर्व यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा करत आले आहेत . शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी व खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी गवळी यांच्या सातत्याच्या प्रयत्नांची दखल घेऊन मुख्यमंत्र्यांना मागील १२ महिन्यांपासून दोन वेळा स्मरण पत्र पाठवून पनवेलच्या पाणी प्रश्नात लक्ष घालण्याची विनंती केली होती. गवळी यांनी अभ्यासपूर्ण विवेचन करून मुख्यमंत्री, पाणीपुरवठामंत्री, मुख्य सचिव, सिडको, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सर्व यंत्रणांकडे सविस्तर माहिती सादर करून पाठपुरावा सुरूच ठेवला होता तरीदेखील काही होत नसल्याने २०१४ साली गवळी यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिकाही दाखल केली होती व त्याद्वारे पनवेल महानगरपालिका व संपूर्ण रायगड जिल्ह्यातील पाण्याचा प्रश्न सोडविण्याबाबत न्यायालयाला साकडे घातले होते अनेकवेळा सुनावणी होऊनही काही निष्पन्न होत नव्हते. आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर ज्येष्ठ शिवसैनिक विष्णू गवळी जिल्हाप्रमुख शिरीष घरत खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी हा प्रश्न मुख्यमंत्र्यांच्या दरबारात लावून धरल्याने मुख्यमंत्र्यांनी प्रधान सचिव नगर विकास यांना तपासून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. मुख्यमंत्र्यांनी स्वतः सदर प्रश्न सदर प्रकरणी लक्ष घातल्याने शासकीय यंत्रणेच चक्र वेगाने फिरली असून पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सिडको वसाहती पण महिना साठी संपादित गावे व उर्वरित रायगडमधील पाण्याचा बिकट प्रश्न मार्गी ..../२

## मास्क न वापरणाऱ्यांवर कारवाई; पनवेल महापालिकेकडून एका दिवसात ८७ हजार रुपये दंड वसूल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यातील काही भागात कोरोनाचे रूग्ण वाढताना दिसू लागल्याने पनवेल महापालिका क्षेत्रात आयुक्त सुधाकर देशमुख यांनी मास्क न वापरणाऱ्यांना ५०० रूपयांचा दंड आकारण्याचे आदेश प्रभाग समिती अधिकार्यांना दिले आहेत. त्यानुसार काल (शुक्रवार, दि.१९ फेब्रुवारी) महापालिका क्षेत्रातील खारघर, कळंबोली, पनवेल, कामोठे भागातून एकुण ८७५०० रूपये एवढा दंड वसूल करण्यात आला.



मास्कचा योग्यरित्या उपयोग न करणार्या तसेच सार्वजनिक जागी थुंकणाऱ्या नागरिकांवर कारवाई करण्यासाठी आदेश कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी दिले आहेत. विना मास्क फिरणाऱ्यांवर जरब बसवणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने चारही प्रभागात सध्या होत असलेली कारवाई वाढविण्यात आली आहे.

या कारवाईत प्रभाग निहाय खालील प्रमाणे दंड वसूल करण्यात आला... प्रभाग समिती 'अ' - १०५०० रुपये प्रभाग समिती 'ब' - ३०००० रूपये प्रभाग समिती 'क' - ३२००० रुपये प्रभाग समिती 'ड' - १५००० रुपये

## श्रीराम जन्मभूमी भव्य मंदिर निर्माणासाठी श्री भगवती संस्थानकडून ०२ लाख ५१ हजार रुपयांची देणगी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्रीराम जन्मभूमी भव्य मंदिर निर्माणासाठी श्री भगवती संस्थान पनवेल यांनी ०२ लाख ५१ हजार रुपयांची देणगी समर्पण निधी म्हणून दिली आहे.

सदरचा धनादेश श्री नारायणबाबा यांनी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे आज सुपूर्द केला.

## अरविंद पोतदार यांचा वाढदिवस कुष्ठरोगी बांधवांसोबत साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पत्रकार महासंघाच्या कार्यकारिणीचे सदस्य अरविंद पोतदार यांचा वाढदिवस शनिवार २० फेब्रुवारी रोजी पनवेल रेल्वे स्टेशन जवळील माल धक्का येथील गणेश कुष्ठरोग वसाहतीतील बांधवांना खाऊ वाटप करून साजरा करण्यात आला.



पनवेल तालुका पत्रकार महासंघाची स्थापना झाल्यावर सदस्यांचे वाढदिवस केक कापून साजरे न करता त्या ऐवजी गरजूंना मदत करून साजरे करू या असे ज्येष्ठ सल्लागार सुनील पोतदार आणि प्रमोद वालेकर यांनी सांगितले होते. शनिवार २० फेब्रुवारी रोजी महासंघाचे कार्यकारिणी सदस्य अरविंद पोतदार यांचा वाढदिवस केक न कापता माल धक्का येथील गणेश कुष्ठरोग वसाहतीत जाऊन तेथील बांधवांना खाऊचे वाटप करून साजरा करण्यात आला

पत्रकार अरविंद पोतदार यांना कुष्ठरोग वसाहतीतील जेष्ठांनी दीर्घा आयुष्य लाभो असा आशीर्वाद दिला. गणेश कुष्ठरोग सेवा संघाचे सचिव अशोक आंबेकर यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे ज्येष्ठ ..../२

## जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून केमस्पेक मधील कामगारांना भरघोस पगारवाढ आणि सुविधा



**दै.रायगड नगरी । तळोजा**

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील केमस्पेक केमिकल कंपनीमधील कायमस्वरूपी कामगारांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कामगार नेते जितेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून भरघोस पगारवाढ आणि सोयीसुविधा देण्याचा करार आज (दि. २०) येथे संपन्न झाला.

तीन वर्षासाठी झालेल्या या करारानुसार कामगारांना पहिल्या वर्षी ९२५०, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षी प्रत्येकी १६२५ रुपयांची अशी एकूण दरमहा १२ हजार ५०० रुपयांची पगारवाढ तसेच मेडिकल पॉलिसी, २० टक्के बोनस, ५० हजार रुपये बिनव्याजी कर्ज, आदी सुविधा या कामगारांना देण्यात येणार आहे.

पनवेल तालुका व शहर भाजपच्या ..../२

> कामगार जगला तर कारखाने जगतात, त्यामुळे कामगारांना त्याचे न्यायिक हक्क मिळाले पाहिजेत, त्याचबरोबर कारखान्यांची प्रगतीही झाली पाहिजे अशी आमची आग्रही भूमिका कायम असते. त्यामुळे आम्ही कामगारांच्या हक्कांसाठी सदैव पाठीशी आहोत. कंपनी आणि कामगार यांनी प्रगतीसाठी हातात हात घालून काम करणे क्रमप्राप्त आहे. कामगार कंपनीच्या नफ्यात भर पाडण्यासाठी सहकार्य करीत आले आहेत यापुढेही करतील.
>
> **- आमदार प्रशांत ठाकूर**

> कामगार आणि कंपन्यांचे विकासासाठी नाते अतूट रहावे, यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली संघटना प्रयत्नशील आहे. कामगारांच्या उन्नतीसाठी काम करीत आहे, त्यामुळे त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहोत.कोविडच्या कठीण परिस्थितीत आपल्या युनिटच्या कामगारांनी कंपनी सुरु ठेवण्याची आणि उत्पादन वाढविण्याचे काम केले आहे. त्यामुळे या युनिटच्या कामगारांचा अभिमान वाटतो.
>
> **- कामगार नेते जितेंद्र घरत**

## मारामारीच्या गुन्हयात आरोपी यांस सश्रम कारावास

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती एस.व्ही.घारगे सो यांनी आरोपी श्रीकृष्ण सहदेव चव्हाण वय-६५ वर्ष रा. वरंडे, ता.अलिबाग यास यातील फिर्यादी यांना मारहाण केल्याचे आरोपाखाली भा.द.वि. कलम ३२४ प्रमाणे तीन महिने सश्रम कारावास, ३२३ प्रमाणे एक महिना सश्रम कारावास,५०६ प्रमाणे एक महिना सश्रम कारावास व फिर्यादीस १०,०००/-रुपये नुकसान भरपाई देणे अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाची थोडक्यात हकीकत की, सदर प्रकरणातील फिर्यादी हे आपल्या घराच्या अंगणामध्ये फोनवर बोलत असतांना त्यांचे शेजारी राहणारे यातील आरोपीत श्रीकृष्ण सहदेव चव्हाण, रा.वरंडे, ता.अलिबाग हे शेतावर जात असतांना फिर्यादी यांच्या घरासमोर आले असता फिर्यादीस बघुन आरोपीने फिर्यादीच्या अंगणातील झाडावर थुंकले, म्हणून फिर्यादी यांनी त्याबाबत आरोपी यास, मला बघून का थुंकलास? असे ..../२

# ऋतुबदलाची कृषी हाक

हिवाळ्यातील गारठ्याच्याच बळावर टच्च भरलेला हरभरा झाडावरून उतरण्याची वाट पाहात होता, ओंबीवर आलेल्या गव्हाच्या दाण्यात चीक भरला गेला होता आणि द्राक्षाच्या बागाही आपल्या घडांना बाजार दाखवण्यासाठी वाकलेल्या होत्या. शेतकरी खुशीची स्वप्ने पाहात असतानाच अवकाळी पावसाने नेमके गाठले. करोनाचा कहर थोडा कमी झाल्यावर, वर्षभरात बिघडलेली आर्थिक घडी आता पुन्हा एकदा नीट बसवू अशा विचारांचा शिडकावा होत असतानाच, त्या सुखस्वप्नांवर अवकाळी पावसाने अक्षरशः पाणी ओतले. हाती आलेली पीके डोळ्यांदेखत हातातून जात असल्याचे अलिकडे वारंवार अनुभवावे लागत आहे. खरीप आणि रब्बी अशा दोन्ही पिकांबाबत हे होत असल्याने त्यातून सावरण्याचीही संधी मिळत नाही. हवामान अंदाजाचे शास्त्र गेल्या काही वर्षांत अत्याधुनिक झाले आहे. काही इशारे चुकत असले तरी साधारणतः पावसाचा, मान्सूनचा अंदाज आता बरोबर येतो. पावसाचा इशारा गेल्या तीन-चार दिवसांपासून मिळत होता, परंतु पावसाने रब्बी पिकांना अशा वळणावर गाठले की या इशाऱ्यांकडे हताशपणे पाहण्याव्यतिरिक्त शेतकरी काहीच करू शकत नव्हता. मध्य महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ सगळीकडेच गुरुवारच्या या अवकाळी पावसाने चार पैसे हाती येण्याच्या आशा-अपेक्षांना चूड लावली, गेल्या तीन-चार महिन्यांचे श्रम मातीमोल केले. महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातीलच कृषिव्यवस्था शेकडो वर्षांत तयार झालेल्या ऋतुचक्राभोवती फिरते. जगभरात जंगलाने व्यापलेल्या भूप्रदेशाचे कमी कमी होत गेलेले प्रमाण, प्रदूषण अशा विविध घटकांनी या ऋतुचक्रात बदल घडवून आणले आहेत. त्यातूनच अनियमित आणि अवकाळी पावसाचे नवे चक्र तयार झाले. या चक्राचा अद्याप पूर्णांशाने अंदाज येत नाही कारण बदलाची प्रकिया सुरू आहे. हा बदल चांगला असो अथवा वाईट, त्याला एक स्थायी स्वरूप आले तर नव्या ऋतुचक्रानुरूप शेतीची रचना होऊ शकेल. मात्र, ही प्रक्रिया किती वर्षे चालणार आहे, ते एका निसर्गालाच ठाऊक असल्याने सध्या त्याचा मारा सहन करण्याशिवाय पर्याय नाही, अशी स्थिती आहे. कालच्या पावसाने आणि गारपिटीने ज्वारी, गहू-हरभरा आडवा झाला. कांद्याचे नुकसान झाले. द्राक्षबागांची पडझड झाली. भाजीपाला, झेंडूची फुले यांचे नुकसान झाले. कोकणातील आंब्याचा मोहोर गळून पडला. कडबा ओला होऊन काळा पडण्याची भीती निर्माण झाली. शिवाय, अधिक पावसाची शक्यता वर्तवण्यात आल्याने आणखी किती नुकसान होणार आहे, या भीतीने पोटात गोळा आला आहेच. दरवर्षी शेती आणि शेतकरी कल्याणाच्या शेकडो योजना केंद्र व राज्य सरकारे जाहीर करत असतात. परंतु, त्यातील बहुतांश योजना आर्थिक मदत, कर्ज या पद्धतीच्या असतात. अशा योजनांची गरज नाकारता येत नाही. परंतु, मान्सूनच्या बदलत्या आणि अधिकाधिक लहरी होत चाललेल्या स्वभावाशी कसे जुळवून घ्यावे, कृषी संस्कृतीत काय बदल करावेत, याबाबत मागदर्शन करणारी यंत्रणा कामाला लागणे ही आजची निकड आहे. महाराष्ट्रातली नेमकी किती शेती सिंचनाखाली आहे आणि सिंचन घोटाळा झाला अथवा नाही, झाला असेल तर तो किती हजार कोटींचा झाला यावर राजकारण होते. जलयुक्त शिवार योजना यशस्वी आणि अयशस्वी अशा दोन्ही बाजूंनी दावे केले जातात. आकडेवारी सांगितली जाते. प्रत्यक्ष शेतीचा आढावा घेऊन त्याचे खरे-खोटे करण्याची ना यंत्रणा आपल्याकडे आहे ना इच्छाशक्ती. गेली काही वर्षे मान्सून वेळेत सुरू होऊन, पंधरा दिवस पडून मग अचानक बेपत्ता होतो. एकदा पाऊस पडला की शेतकरी पेरणी करून मोकळे होतात. पेरणी झाल्यानंतर महिनाभर पावसाने पाठ फिरवली की दुबार पेरणी करावी लागते आणि पहिल्याच पेरणीत पेकाट मोडलेला शेतकरी उन्मळून पडतो. गेली पन्नास वर्षे महाराष्ट्रात चार कृषी विद्यापीठे कार्यरत आहेत. परंतु त्यांनी काही महत्त्वाचे संशोधन करून शेतकऱ्यांना आधार दिला, असे क्वचितच घडल्याचे दिसते. या विद्यापीठांमधून कृषी अधिकारी किंवा बियाणे विकणाऱ्या कंपन्यांना लागणारे विक्री प्रतिनिधीच मुख्यतः तयार होताना दिसतात. राज्यात अजूनही ८०ते ८५ टक्के शेती कोरडवाहू आहे आणि पंधरा ते वीस टक्के बागायती. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीमुळे वारंवार संकटांचा सामना करावा लागतो. मराठवाड्यात पावसाचे प्रमाण कमी आहे आणि पडणारे पाणी साठवता आले, तर दरवर्षी उन्हाळ्यात टँकरच्या मागे होणारी वणवण थांबू शकेल असे म्हटले जाते, मात्र ते प्रत्यक्षात आणण्यासाठी धडपड करण्याची गरज कोणालाच भासत नाही. पर्यावरण रक्षणाची हाक, औद्योगिक विकासाची गरज आणि मान्सूनचा बदलता स्वभाव यातून मार्ग काढायचा असेल तर शेतकऱ्यांना आर्थिक मदतीबरोबरच शेती करण्याचे नवे तंत्रही शिकले पाहिजे. 'आली लहर केला कहर' या स्थितीतून बाहेर पडायचे असेल तर आधुनिक शेतीच्या क्रांतीची गरज आहे.

# सामाजिक समतेसाठी झटणे आव्हानात्मक : सुशिलकुमार शिंदे

## कांतीलाल कडू यांचा शिंदे यांच्या हस्ते गौरव

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**



देशाच्या उन्नतीकरिता झिजताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते, हे लक्षात घेवूनच केंद्रात आणि राज्यात कार्यरत असताना समतेचा अर्थसंकल्प ही संकल्पना राबविली असे स्पष्ट करत सामाजिक समता जपत देशाला ऊर्जितावस्था देणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा मनापासून अभिमान वाटतो कारण ते आव्हानात्मक कार्य करून देश घडवण्यासाठी झटत आहेत असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी काढले.

सामाजिक कार्यकर्ते, संपादक कांतीलाल कडू यांच्यासह राष्ट्रीय स्तरावरील विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांना मानिनी आणि प्रोजेक्ट १०० संस्थांनी शिंदे यांच्या शुभ हस्ते नवी मुंबईतील हॉटेल योगी मिडटाऊनच्या सभागृहात 'ग्लोबल चेंजमेकर' पुरस्कार देवून गौरविले. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर शिंदे यांच्या समवेत पद्मश्री डॉ. विजय शहा, पद्मश्री डॉ. गिरीश प्रभुणे, आयएफएसचे अधिकारी रघुनाथ नायकडे, डॉ. भारती चव्हाण, सुरज गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

१८-२० वर्षापूर्वी केलेल्या कार्याची आठवण आजही लोकं काढतात हाच माझ्यासाठी पुरस्कार आहे, असे म्हणत समाज चांगल्या कार्याची दखल घेतोच असे शिंदे म्हणाले. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सामाजिक दुर्बल घटक, कैकाडी, पारधी समाजाला गुन्हेगारी मुक्तीसाठी काही योजना राबविल्या आहेत. त्यामुळे त्या समाजातूनही आज तरुण-तरुणी डॉक्टर, वकील झाल्या आहेत ही समाजाची उन्नती मानावी लागेल, असे ते म्हणाले. समाजात असलेली उडती पाखरे असतील त्यांना निवारा देणे, त्यांच्यासाठी कार्य करणे ही समाजाची आजची गरज आहे, असे शिंदे यांनी सांगितले.

महात्मा गांधी, नेल्सन मंडेला, मँथु यांच्या नावाने दिला जाणारा ग्लोबल चेंजमेकर पुरस्कार दिला जात आहे ही आनंदाची, अभिमानाची बाब आहे. नेपाळपासून देशातील विविध राज्यातील सामाजिक कार्यकर्त्यांना हा पुरस्कार दिला जातो यातून देशाची उन्नती साधण्याचा आयोजक डॉ. भारती चव्हाण, सुरज गायकवाड यांचे प्रयत्न महत्वपूर्ण असल्याचे गौरवोदगार त्यांनी काढले.

निस्वार्थ बुद्धीने समाजात अहोरात्र कार्य कारणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांमुळे भारत देश नक्कीच सुजलाम सुफलाम होईल असे सांगत ज्यांच्याकडे आत्मविश्वास आहे, तेच समाजाच्या प्रगतीसाठी यशस्वीतेने झिजत राहतात तर ज्यांच्याकडे आत्मविश्वासाचा अभाव असतो ते काहीच करू शकत नाही असे त्यांनी स्पष्ट केले.

पर्यावरणावर देशात गेली तीन दशके अतिशय उत्तमरित्या काम सुरू आहे. त्याचे यशही आपल्याला दिसत आहे. तेव्हा पर्यावरण आणि सामाजिक समता जपली गेली तर नक्कीच देशाला अधिक ऊर्जितावस्था लाभेल असेही शिंदे यांनी सांगितले. पद्मश्री डॉ. विजय शहा, पद्मश्री डॉ. गिरीश प्रभुणे, आयएफएसचे अधिकारी रघुनाथ नायकडे आदींनी उत्तम अनुभव विशद करून कार्यक्रमाला चार चाँद लावले. मानिनीच्या अध्यक्षा डॉ. भारती चव्हाण यांनी प्रास्ताविक केले.

# खा.सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**



सालाबादप्रमाणे यंदाही वहाळ गावात शिवरायांच्या जयंतीचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी या कार्यक्रमास खासदार सुनिल तटकरे यांची प्रमुख उपस्थीती लाभली होती. वहाळ बस स्टॉप येथून गावातील शिवाजी महाराज पुतल्या पर्यंत शालेय विध्यार्थ्या नी गणवेशात ढोल ताशे व लेझिम्ं मध्ये मिरवनुक काढण्यात आली होती. यावेळी खासदार सुनिल तटकरे सह इतर पाहुण्यांनी शिवाजी महाराजा च्या पुतल्यास पुष्प हार अर्पण करुन अभिवादन केले.

सदर कार्यक्रमासाठी पनवेल जिल्हा अध्यक्ष सतीश पाटील विश्वनाथ शेठ पाटील (जेष्ठ नेते शेकाप), राजेंद्र पाटील (संचालक मुंबई कृ ऊ बा समिती), माधव पाटील (जेष्ठ पत्रकार), संदीप पाटील (मा नगराध्यक्ष), रविंद्र पाटील (जि प सदस्य ), भरत बालू पाटील, महादेव बालू पाटील, रमेश बालू पाटील, सुरेश बालू पाटील (मा सरपंच), नारायण शेठ घरत (शेकाप पनवेल ता चिटणीस), पूजा समीर पाटील सरपंच (सरपंच), प्रशांत पाटील (मा सरपंच), सीताराम नाईक (तंटामुक्त अध्यक्ष), विजय शिरढोणकर (मा सरपंच तरघर), मो का मढ्वी गणेश पाटील (मा उपसरपंच) आदी सह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**





अर्जदाराचे वकील ॲड.अनिल सुभाष जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो.यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.२२५/२०२१

ने.ता.०५/०४/२०२१

श्री.मोहम्मद हनिफ दादुमियाॅ पटेल — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार श्री.मोहम्मद हनिफ दादुमियाॅ पटेल यांचा दि.०१/०५/१९६० रोजी मौजे : पाडा मोहल्ला पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड महाराष्ट्र येथे जन्म झाला आहे. सदरहू अर्जदार यांनी त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

श्री.मोहम्मद हनिफ दादुमियाॅ पटेल यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणर नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून सदरहू श्री.मोहम्मद हनिफ दादुमियाॅ पटेल यांचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१८/०२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

अर्जदाराचे वकील ॲड.अनिल सुभाष जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो.यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.२२६/२०२१

ने.ता.२५/०३/२०२१

श्री.असिफ अहमद हुसैनमियाॅ पटेल — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार श्री.असिफ अहमद हुसैनमियाॅ पटेल यांचा दि.०५/०१/१९७० रोजी मौजे : पाडा मोहल्ला पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड महाराष्ट्र येथे जन्म झाला आहे. सदरहू अर्जदार यांनी त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

श्री.असिफ अहमद हुसैनमियाॅ पटेल यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणर नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून सदरहू श्री.असिफ अहमद हुसैनमियाॅ पटेल यांचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२०/०२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

अर्जदाराचे वकील ॲड.अनिल सुभाष जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो.यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.२३१/२०२१

ने.ता.०५/०४/२०२१

श्री.इरफान दादुमियाॅ पटेल — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार श्री.इरफान दादुमियाॅ पटेल यांचा दि.१०/०८/१९६८ रोजी मौजे : पाडा मोहल्ला पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड महाराष्ट्र येथे जन्म झाला आहे. सदरहू अर्जदार यांनी त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

श्री.इरफान दादुमियाॅ पटेल यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणर नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून सदरहू श्री.इरफान दादुमियाॅ पटेल यांचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२०/०२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

अर्जदाराचे वकील ॲड.अनिल सुभाष जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो.यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.२२९/२०२१

ने.ता.२५/०३/२०२१

श्री.खलील अहमद दादुमियाॅ पटेल — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार श्री.खलील अहमद दादुमियाॅ पटेल यांचा दि.०५/०४/१९६७ रोजी मौजे : पाडा मोहल्ला पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड महाराष्ट्र येथे जन्म झाला आहे. सदरहू अर्जदार यांनी त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

श्री.खलील अहमद दादुमियाॅ पटेल यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणर नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून सदरहू श्री.खलील अहमद दादुमियाॅ पटेल यांचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२०/०२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

अर्जदाराचे वकील ॲड.अनिल सुभाष जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो.यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.२२८/२०२१

ने.ता.०५/०४/२०२१

श्रीमती.नसरीन गफूर पटेल — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार श्रीमती.नसरीन गफूर पटेल यांचा दि.१५/१०/१९७५ रोजी मौजे : पाडा मोहल्ला पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड महाराष्ट्र येथे जन्म झाला आहे. सदरहू अर्जदार यांनी त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

श्रीमती.नसरीन गफूर पटेल यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणर नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडून सदरहू श्रीमती.नसरीन गफूर पटेल यांचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१८/०२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

## मुख्यमंत्री पनवेल दौऱ्यावर

लागावा या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून पस्तीस वर्षे जुने असलेल्या जलशुद्धीकरण केंद्रास स्वतः मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे सोमवारी भेट देत आहेत. भोकरपाडा ते कळंबोली ही पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी पस्तीस वर्षे जुनी असून प्रत्येक सोमवारी दुरुस्ती करता शटडाऊन बंद घ्यावा लागतो त्यामुळे पनवेल खारघर कळंबोली कामोठे व महापालिका क्षेत्रातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागतो हा त्रास कायमस्वरूपी संपावा याकरता ही जीर्ण अवस्थेतील पाईपलाईन बदली करणे अत्यंत गरजेचे आहे त्यामुळे पनवेल महापालिका क्षेत्राचा पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत होईल व पनवेलचा पाणी प्रश्न मोठ्या प्रमाणावर सुटेल असा आत्मविश्वास जिल्हाप्रमुख शिरीष घरत ज्येष्ठ शिवसैनिक सामाजिक कार्यकर्ते विष्णू गवळी यांनी व्यक्त केला आहे. मुख्यमंत्री आम्हाला नक्कीच न्याय मिळवून देतील असा विश्वास गवळी यांनी व्यक्त केला आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्रास भेट ही पनवेल वा सी यांसाठी ग्रेट भेट ठरेल अशी चर्चा आहे.

## अरविंद पोतदार यांचा वाढदिवस साजरा

सल्लागार सुनील पोतदार, प्रमोद वालेकर, अध्यक्ष रत्नाकर पाटील, प्रदीप वालेकर, सुधीर पाटील, वाघपंजे, संजय कदम, गणेश कुष्ठरोग सेवा संघाचे प्रकाश पाटकर, विलास कदम, शैला आंबेकर, स्वाती केंडे आणि अनिता जाधव उपस्थित होत्या.

## कामगारांना भरघोस पगारवाढ आणि सुविधा

मध्यवर्ती कार्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थित झालेल्या या करारनाम्यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, युवा नेते दशरथ म्हात्रे, भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, केमस्पेकचे व्यवस्थापक राजेंदर हारकरा, अनुराग तिवारी, संघटनेचे उपाध्यक्ष पांडुरंग पाटील, रविंद्र नाईक, कार्यालयीन सचिव समीरा चव्हाण, संघटक रवींद्र कोरडे, राजेंद्र कारेकर, रामदास गोंधळी, कामगार प्रतिनिधी संतोष घरत, अंकुश भोईर, आतिष भगत, जीवन भोईर, रुपेश ठाकूर, बळीराम भोईर, आदी उपस्थित होते.

## मारामारीच्या गुन्हयात आरोपी यांस सश्रम कारावास

विचारले असता आरोपी यांनीफिर्यादीस त्याचे हातातील कोयता डोक्यात मारून दुखापत केली होती.याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गु.र.नं.६५/२०१८ भा.द.वि. क३२४,३२३,५०४,५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.सदर खटल्याचा तपास पूर्ण करुनतपासिक अंमलदार पो.हवा/१२४२अे.जी.साळुंखे यांनी दोषारोपपत्र मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अलिबाग क्र.१ यांचे न्यायालयात दाखल केले होते.

सदर खटल्याची सुनावणी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अलिबाग क्र.१ श्रीमती एस.व्ही.घारगे मॅडम यांचे न्यायालयात झाली. या केसमध्ये सरकार पक्षातर्फे सहा. सरकारीअभियोक्ता ॲड.कविता परिट मॅडम यांनी एकूण ७ साक्षीदार तपासले.सदर गुन्हयातील फिर्यादी यांची साक्ष महत्वपूर्ण ठरली.

तसेच पैरवी अधिकारी पो.हवा/९६७ एस.बी.नाईक, आणि रेवदंडा पोलीस ठाण्याचे कोर्ट डयुटी अंमलदार पोशि/२३९७ एम.डी.दुम्हारे यांचे सहकार्य मोलाचे ठरले. तसेच तपासिक अंमलदार पो.हवा/१२४२ अे.जी.साळुंखे यांचा तपास महत्वपूर्ण ठरला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

# कोलाड खांब विभागात शिवजयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील कोलाड खांब विभागातील खांब देवकान्हे विभागातील मौजे खांब, गोवे, नडवली, तळवली, चिल्हे, धानकान्हे, बाहे, देवकान्हे या विभागात बहुजन प्रतिपालक, कुळवाडी भूषण जगविश्वविख्यात छ शिवाजी महाराज हे अखिल महामानव जातीचे उद्गाते होय सर्व धर्म समभाव, समतेचे प्रतीक म्हणून लौकिक मिळवलेल्या एकमेव उद्वितीय छ शिवरायांची शिवजयंती भारत वाशियांचा राष्ट्रीय उत्सव आहे आणि या उत्सवाचे औचित्य साधून स्वा.सु.नि.अलीबागकर महाराज, गोपालबाबा वाजे, धोंडू बाबा कोल्हटकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या खांब पंचक्रोशीतील मौजे चिल्हे येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छ्त्रपती शिवाजी महाराज यांचा ३९१ वा जन्मोत्सव सोहळा मंगळवार दि.१९/२/२०२१ रोजी खांब देवकान्हे विभागात शिवजयंती विविध कार्यक्रमानी साजरी करण्यात आली.

ज्ञानांकुर इंग्लिश मेडिअम स्कूल खांब, राजिप शाळा खांब,नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचालित रा ग पोटफोडे मास्तर विद्यालय व कै द ग तटकरे कनिष्ठ महाविद्यालय खांब, राजिप शाळा नडवली, राजिप शाळा तळवली तर्फे अष्टमी, राजिप शाळा चिल्हे, तसेच पत्रकार रायगड भूषण डॉ श्याम लोखंडे यांच्या निवस्थांनी यशवंत नथू लोखंडे स्मूर्ती सार्व व वाचनालय व ग्रंथालय ग्रामस्थ व युवक मंडळ चिल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली.

यावेळी ग्रुप ग्राम पंचायत तळवली तर्फे अष्टमीच्या उपसरपंच सौ मानसी लोखंडे सदस्य सौ रिया लोखंडे, रवींद्र लोखंडे, मंगेश लोखंडे, सौ पूजा लोखंडे, संदीप महाडिक, गाव कमिटीचे अध्यक्ष सुधीर लोखंडे प्रमोद लोखंडे आदी उपस्थित होते, राजिप धानकान्हे, आ.वाडी, राजिप शाळा बाहे, राजिप शाळा देवकान्हे, या विविध ठिकाणी लहांनापासून आभालवृद्ध नागरिकांनी मोठ्या उत्साह वातावरणात साजरी करून विविध ठिकाणी विविध कार्यक्रमांनी हा जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

# कायद्याच्या सुयोग्य वापरासाठी शिक्षण हाच पाया : पी.जी.लंबे

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले आदिवासी वाडी येथे कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन शनिवार २० फेब्रुवारी तालुका विधी सेवा समिती श्रीवर्धन आणि वकील संघटना श्रीवर्धन-म्हसळा यांच्या वतीने करण्यात आले.



बोर्लीपंचतन शहरालगत असणाऱ्या कार्ले आदिवासीवाडी समाज मंदिर येथे जागतिक सामाजिक न्याय दिनाच्या निमित्ताने कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. कायद्याचा आधार घेण्यासाठी प्रथम आपला शिक्षणाचा पाया मजबूत असावा, आदिवासी समाजाला कायद्याने लागणारी मदत ही न्याय व्यवस्था कायद्याच्या अधीन राहून देण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करीत असते. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट हेच आहे की दुर्बल घटकापर्यंत पोहचून कायदे विषयक ज्ञानाचा लाभ व्हावा. असे प्रतिपादन न्यायाधीश पी.जी. लंबे यांनी कायदेविषयक मार्गदर्शन शिबिरात केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान लंबे यांनी भूषविले.

त्याचप्रमाणे या शिबिरामध्ये उपस्थितांना मार्गदर्शन करताना दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहा निरीक्षक महेंद्र शेलार यांनी बालविवाह कायदा, पोस्को सारखे गुन्हे, आदिवासी महिलांनी पोलिस यंत्रणेकडे निर्भयपणे विनयभंग सारख्या गुन्ह्यासाठी दाद मागण्यासाठी पुढे यावं असे महत्वपूर्ण मार्गदर्शन यावेळी केले. तसेच ऍड. अतुल चौगुले यांनी भारतीय संविधानाविषयी आणि कायद्याने तरतूद केलेल्या न्याय व्यवस्थेकडून मोफत वकील कसा घेता येईल याचे मार्गदर्शन केले. ऍड. विठोबा पाटील यांनी महिला विषयी कायद्याचे सखोल मार्गदर्शन केले. या कायदेविषयक शिबिरात आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी दिपक कांबळे, स्वप्नील नाक्ती, नयन धनावडे, ऍड.जयदीप तांबुटकर, शैलेश चांदोरकर, संतोष सापते व ग्रामसेवक गोवारी आणि कार्ले आदिवासी समाज अध्यक्ष शशिकांत पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक विधी स्वयंसेवक निलेश नाक्ती तर सूत्रसंचालन किरण चाळके यांनी केले.

# सलग सुट्ट्यांमुळे काशिद- बिच फुलला !

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शुक्रवारी तारखे प्रमाणे अस-लेली शिवजयंती, शनिवार रविवार सलग सुट्ट्यामुळे मुरुड जंजिरा पर्यटनात काशिद - बिच पर्यटकांनी फुलल्याचे चित्र दिसून आले तर याठिकाणी रस्त्यावर दुतर्फा वाहनांच्या रांगा लागलेल्या होत्या.

मुरुड जंजिरा पर्यटनात काशिद-बीचला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले असून शनिवार रविवार व सुटीच्या दिवशी याठिकाणी मुंबई, पुणे नाशिक अन्य ठिकाणांहून मोठ्या प्रमाणावर पर्यटक भेट देत असतात तसेच देश-विदेशातूनही पर्यटक याठिकाणी आवर्जून भेट देत असतात. रस्त्यावर वाहनांच्या दुतर्फा रांगा लागल्याने वेळप्रसंगी ट्रॅफिक जॅम ला सामोरे जावे लागते. विशेष करून इटली मधील पटाया बिचशी साम्य असणारा पांढरीशुभ्र वाळू, निळेशार पाणी असलेला काशिद-बिच समुद्र किनारा पर्यटनात पर्यटकांचे आकर्षण ठरला असून हजारोंच्या संख्येने पर्यटक भेट देत असतात. याठिकाणी पर्यटकांसाठी विविध खाद्य-पेय स्टॉल्स उपलब्ध आहेत.

समुद्र सफरीत घोडा-उंट सफर, बनाना, स्पिड-बोट, पेरॉसिलिंग बोट सफरीचा मनमुराद आनंद पर्यटक घेत असतात. पार्किंग व्यवस्था, सुरक्षिततेसाठी सुरक्षारक्षक, गार्ड असून पोलिस बंदोबस्त असतो. याठिकाणी पर्यटकांनी पोहण्याचा अनावर मोह टाळून पर्यटनाचा मनमुराद आनंद लुटावा. असे आवाहन येथील स्टॉल धारक, ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

शनिवार रविवार व सुटीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर वर्दळ लक्षात घेऊन याठिकाणी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलीस चौकी, सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. गर्दीत हरवणा-या लहान मुले, चिजवस्तू, भरती-आहोटी, धोक्याच्या सूचना देण्यात याठिकाणी अनाउन्समेंट साठी लाऊडस्पिकर बसविणे आवश्यक आहे तसेच पर्यटकांसाठी पिण्याच्या पाण्याची, प्रसाधनगृह व शौचालयाची दुरवस्था पाहाता अद्ययावत सुविधा उप-लब्ध करून देण्याची मागणी जोर धरीत आहे.



# सकल मराठा समाजाच्या वतीने शिवजयंती उत्सव उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सकल मराठा समाज खांदा कॉलनी च्या वतीने शिवजयंती उत्सव -२०२१ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सकल मराठा समाज खांदा कॉलनी च्या वतीने शिवजयंती उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. या वर्षी कोविड -१९ संसर्ग जन्य महामारीमुळे उद्भवलेल्या परस्थितीचा विचार करता मंडळाने या वर्षीचा शिवजयंती उत्सव जल्लोष तो नसला तरी त्याच उत्साहाने प्रशासनाने दिलेल्या नियमांचे पालन करत साजरा केला मंडळाचे यंदाचे ४ थे वर्ष होते.

या प्रसंगी खांदा कॉलनी सह पनवेल परिसरातील शिवप्रेमीसह सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रा-तील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली अशी माहिती सकल मराठा समाज खांदा कॉलनी चे समनव्यक संतोष जाधव यांनी दिली.


ॲड.प्रशांत भुजबळ
अर्जदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२२६/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.२८/४/२०२१

कै.पार्वती चांगू हुदार मयतचे वारस
१) श्री.शंकर चांगू हुदार
वय : ७३ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.विष्णू चांगू हुदार
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
दोघेही रा.करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.हिराबाई चांगू हुदार
उर्फ निर्मला बाळाराम म्हात्रे
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कोन, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.जयाबाई चांगू हुदार
उर्फ श्रीमती.सुनिता विश्वनाथ म्हसकर
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड
कै.भगवान चांगू हुदार मयतचे वारस
५) श्रीमती.रामुबाई उर्फ चंद्रभागा भगवान हुदार
वय : ७२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड
६) श्रीमती.शोभा भगवान हुदार
उर्फ शोभा भालचंद्र मुणे
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड
७) श्री.ज्ञानेश्वर भगवान हुदार
वय : ४६ वर्षे, धंदा : शेती
रा.करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.पार्वती चांगू हुदार यांचे निधन दि.२९/०४/१९९६ रोजी झालेले आहे. तसेच कै.पार्वती चांगू हुदार यांचे पती कै.चांगू काळु हुदार यांचे निधन दि.१४/०२/१९८५ रोजी झालेले आहे. कै.पार्वती चांगू हुदार यांचा मयत मुलगा कै.भगवान चांगू हुदार यांचे निधन दि.०२/१०/१९७४ रोजी झालेले आहे. कै.पार्वती चांगू हुदार या मयत झालेल्या असल्याने श्री.शंकर चांगू हुदार वगैरे ह्यांनी कै.पार्वती चांगू हुदार यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | यु.केस नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| करंजाडे | ७९ | ८ | २ | ०-३३-४ | ८.१२ |
| | | १२९ | १ | ०-८९-५ | १३.०७ |
| करंजाडे | ३१/३०५ | ९२ | ६ पैकी | ०-०५-० | १.०७ |
| | | १६ ए | १ | ०-३६-६ | ५.१४ |
| करंजाडे | ८४ | १६ ए | २ | १-२४-७ | १४.७ |
| करंजाडे | ८६ | १६ बी | ० | ०-११-४ | ०.०० |
| करंजाडे | ८८ | १८ अ | ० | ०-४२-० | ३.५० |
| करंजाडे | १४२ | १९ अ | ० | ०-८२-४ | २.१२ |

वर नमूद मिळकतीच्या संपादनापोटी वितरित करण्यात आलेली नुकसान भरपाई कै.पार्वती चांगू हुदार व इतर यांना देण्यात आलेली आहे. सबब, सदर संपादीत मिळकतींपोटी सिडकोकडून १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडको फाईल नं.करंजाडे ३४६ अन्वये दि.०६/०८/२००७ रोजीच्या अंतरिम इरादापत्राने कै.पार्वती चांगू हुदार व इतर यांना सामाईकपणे मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड नं.३५, सेक्टर नं.४, क्षेत्र ११०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड वितरित करण्यात आलेला असून भविष्यात अंदाजे २३०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड वितरित करण्यात येणार आहे.

श्री.शंकर चांगू हुदार वगैरे हे कै.पार्वती चांगू हुदार यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.शंकर चांगू हुदार वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.पार्वती चांगू हुदार यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२०/०२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


# पर्यटकांना भुरळ घालणारे सुंदर निसर्ग रम्य 'रानसई धरण'

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

उरण तालुक्यातील गव्हाण फाटा - चिरनेरकडे जाताना दिघोडे गाव फाटा लागतो. या फाट्यावरून पूर्वेकडे रानसई धरणाचा रस्ता जातो. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला कंटेनर यार्ड, फार्महाऊस झाले आहेत. धरण आवाराच्या गेटपर्यंत गाडी जाते. धरण व्यवस्थापनाची परवानगी घेऊन धरण पाहता येते. अनेक तेकड्यांच्या कुशीत हे सुंदर निसर्गरम्य धरण वसले आहे.

रानसई धरण आवारात जलशुध्दीकरण यंत्रणा आहे. आजूबाजूला सुंदर बगीचे तयार करण्यात आले आहेत. एक डांबरी रस्ता डोंगराच्या कडेने धरणाच्या एका टोकावर जातो. धरणाच्या मधल्या भागात वर पर्यत जाण्यास लोखंडी जिना केलेला आहे. धरणावर पोहचल्यावर पाण्याचा पसारा आणि हिरवे डोंगर/तेकड्यांच्या प्रदेश पाहून मन हरकुन जाते. अशा डोंगर परिसरात पाहिले असता कर्नाळा किल्ला पर्यंत नजर जाते. धरणाच्या पाण्यात मासेपकडणा-या होड्या दिसतात. स्थानिक लोक मासे पकडतात. ' गल ' टाकून मासे पकडण्यास परवानगी आहे. काला मासा, शिवडा, करवाला ( खवल्या) , कटला, रोहू मासे मिळतात. पावसाळ्यात धरण परिसरात डोंगरातील ' गो-या चिंबो-या ' सापडतात. एम. आय. डि. सी. चे हे धरण आहे. या धरणाची जल धारण क्षमता १००० कोटी लिटर म्हणजे १० एम. सी. एम. इतकी आहे. १९७१ साली धरणाची उंची १०० फुट होती. १९८१ साली ती १२० फुट करण्यात आली आहे. धरण लांबी ७७० फुट , ओव्हर प्लोसेक्शन ३०० फुट आहे. धरणाचे क्षेत्र ३७१२ एकर आहे तर बाधित क्षेत्र ४३५० एकर आहे. जी.टी. पी. एस. , ओ. एन. जी.सी. , उरण शहर आणि २५ गावांना येथून पाणी पुरवठा केला जातो. दरवाज्यांची संख्या १५ आहे. पावसाळ्यात धरण भरुन वाहू लागले की धरणातील पाणी पाणी लहान नदीत सोडण्यात येते. या नदीकिणारी पावसाळ्यात लोक मौज करण्यासाठी गर्दी करतात. रानसई धरणाच्या प्रवेशद्वारांजवळील गेटच्या बाहेर गणपतीचे मंदिर आहे. या मंदिरासमोर मोठी सावलीसाठी शेड असून तिथे बसण्यासाठी सुविधा आहे. इथे दर्शन घेऊन वनभोजन करता येईल. इथल्या रानवाटेने आदिवासी लोक लाकडी मोळ्या डोक्यावर घेऊन जाताना दिसतात. ' गल ' टाकून मासे पकडण्याच्या छंद असलेल्या लोकांना हे धरण आनंदाची पर्वणी आहे.


मा.बहिर साहेब
ॲड.विशाल मुंडकर
अर्जदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.७९३/२०२०
नि.नं.९/ड
ने.ता.४/३/२०२१

सौ.मंजुला चंद्रकांत ठाकरे
वय : ४२ वर्षे, धंदा : घरकाम
रा.मु.नानोशी गराडा, पो.कुंडेवहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार यांची आई शांताबाई रामदास घरत या दि.११/०७/१९९७ रोजी मयत झाल्या आहेत. शांताबाई रामदास घरत यांच्या सामाईक मालकीच्या मौजे : न्हावे, ता.पनवेल येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत ''नवी मुंबई'' प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे. सदर मिळकतींचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| युनिट केस नंबर | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| न्हावे-१ | अ | ५४४ | ०-०९-८ |

आता शासनाने जाहीर केलेल्या साडेबारा टक्के भूखंड योजनेचे अंतर्गत सदर मयत शांताबाई रामदास घरत यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारे भूखंड सदर अर्जदार व त्यांचे इतर सहमालक यांस मिळणेकरिता अर्जदार हिने ती शांताबाई रामदास घरत यांची वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२० माहे २ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मे.दुबे कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रा तर्फे भागीदार श्री.दयाशंकर रामचंद्र दुबे, पत्ता : ऑफिस नं.१ व २, पहिला मजला, गायत्री पॅराडाईज, प्लॉट नं.५६, सेक्टर ३, करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या मालकीचे खालीलप्रमाणे वर्णन केलेले भूखंड आहेत. सदर भूखंडाचे वर्णन केलेली मिळकत आहे.

**भूखंडाचे वर्णन**
**मौजे : पुष्पक नोड-वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील**
**१) भूखंड क्र.२०३, सेक्टर-आर १, क्षेत्र ८० चौ.मी.**
**आणि**
**२) भूखंड क्र.२०४, सेक्टर-आर १, क्षेत्र ८० चौ.मी.**

वर नमूद केलेले दोन्ही भूखंड मे.दुबे कंन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रा तर्फे भागीदार श्री.दयाशंकर रामचंद्र दुबे, यांनी सदर भूखंडाचे मुळ मालक श्री.कान्हा बंडू डाकी व श्री.संतोष नामदेव डाकी यांच्याकडून नोंदणीकृत त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करून घेतलेले आहेत. वर नमूद भूखंडापैकी भूखंड क्र.२०३ चा त्रिपक्षीय करार पनवेल येथील मे.दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात दस्त क्र.पवल-२, ७०१५/२०१८ अन्वये दि.२९/०५/२०१८ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला असून भूखंड क्र.२०४ चा त्रिपक्षीय करार पनवेल येथील मे.दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात दस्त क्र.पवल-४, ६३५७/२०१९ अन्वये दि.२५/०६/२०१९ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला आहे.

आता वर नमूद दोन्ही भूखंड आमचे अशिल श्री.निकलेश विष्णू परदेशी आणि श्री.नकुल विष्णू परदेशी यांनी कायमस्वरुपी सदर भूखंडामधील सदर भूखंडाचे मालक मे.दुबे कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रा तर्फे भागीदार श्री.दयाशंकर रामचंद्र दुबे, यांचे सर्व हक्क हस्तांतरीत करून घेण्याचे ठरविले आहे. त्याअर्थी सदर दोन्ही भूखंडामध्ये अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिन्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु, हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकविस दिवसांचे आत आमच्या वर नमूद पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर दोन्ही भूखंडामधील सदर भूखंडाचे मालक मे.दुबे कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रा तर्फे भागीदार श्री.दयाशंकर रामचंद्र दुबे, यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.२०/०२/२०२१

**सही/-**
**ॲड.श्री.विशाल अनंत मुंडकर**
**शॉप नं.२, पवन अपार्टमेंट, रत्नाकर खरे मार्ग, नवीन जिल्हा कोर्टासमोर,**
**पनवेल-४१०२०६, जि.रायगड**
**मो.नं.९२२१७७७६०४**



श्री.भाकरे साो.कोर्ट
अर्जदारांतर्फे वकील : ॲड.एस.जी.राणे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२२०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३१/३/२०२१

कै.दत्तात्रय लक्ष्मण केदारे-मयतचे कायदेशीर वारसदार
१) श्रीमती.संध्या दत्तात्रय केदारे
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी/वयोवृद्ध
रा.६०२, मंगलमुर्ती, प्लॉट नं.१९,
श्रीकृपा हॉलच्या जवळ, सेक्टर ६, खांदा कॉलनी,
ता.पनवेल, जि.रायगड
२) ज्योती मयुर थोरात (विवाहित मुलगी)
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मैत्रेय रो-हाऊस नं.१४, न्यू म्हाडा कॉलनी,
पवार नगर, ठाणे (पश्चिम) ४००६१०
३) श्री.समीर दत्तात्रय केदारे
वय : ३६ वर्षे, धंदा : व्यापार/आय.टी.इंजिनिअर
रा.६०२, मंगलमुर्ती, प्लॉट नं.१९,
श्रीकृपा हॉलच्या जवळ, सेक्टर ६, खांदा कॉलनी,
ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.स्वाती गिरीष गायकवाड (विवाहित मुलगी)
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी/प्रोफेसर
रा.डी-३०४, ग्रीट रेसिडेन्सी, घाटकोपर,
मानखुर्द, लिंक रोड, आर.बी.के.स्कूलच्या जवळ,
गोवंडी, मुंबई ४०००४३ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.दत्तात्रय लक्ष्मण केदारे यांचा मृत्यू दि.०७/०७/२०१७ रोजी झाला. त्यांचे मृत्यूच्या पश्चात खालील वर्णन केलेल्या मिळकतीत असलेल्या त्यांच्या सामाईक हिश्श्याबाबत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

१) कै.दत्तात्रय लक्ष्मण केदारे हे त्यांच्या हयातीत सदनिका नं.६०२, सहावा मजला, (क्षेत्र ८३० चौ.फूट कारपेट एरिया (७७.१४ स्क्वे.मी.कारपेट) + फ्लोअर बेड, ६३.३१ चौ.फूट कारपेट एरिया + कप्बर्ड एरिया ५६.१८ चौ.फूट + बाल्कनी एरिया ४३.५९ चौ.फूट कारपेट), आकारमानाची सदनिका धारण करीत होते. अर्जदार व सामनेवाला हे कै.दत्तात्रय लक्ष्मण केदारे यांचे वरील मिळकती संबंधात कायदेशीर वारसदार आहेत. त्याच्या या हक्कांबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार व सामनेवाला यांच्या हक्कांबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार व सामनेवाला हे कै.दत्तात्रय लक्ष्मण केदारे यांच्या वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारस दाखला मंजूर करेल.

आज दि.२०/२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रस्त्याच्या कडेला उभी करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घोट गाव ते तळोजा फेज २ दरम्यान घडली आहे.

राजू गोविंद राठोड (४०) यांनी त्यांची ११ हजार रुपये किंमतीची फॅशन प्रो मोटार सायकल क्र.एमएच-४३-एए-९७९१ ही कोयनावेळे गावातील कमानीपासून ४०० मीटर अंतरावर घोटगाव ते तळोजा फेज २ या दरम्यान रस्त्याच्या कडेला उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर मोटार सायकल चोरुन नेल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## वॉचमन बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

काळुंद्रे गाव येथे वॉचनमचे काम करणारा एक इसम बेपत्ता झाल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

भरत किसन खडका (३८) उंची ५ फूट, रंग सावळा असून अंगात काळ्या पांढर्या रंगाची पट्टी असलेला टी-शर्ट व काळ्या रंगाची हाफ पॅन्ट, पायात स्लिपर घातली आहे. तसेच तो नेपाळी भाषा बोलतो या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा सहा.पो.नि.धनवडे यांच्याशी संपर्क साधावा.

## वृद्ध इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गणपती मंदिरात जावून येतो असे सांगून ८० वर्षीय वृद्ध इसम घराबाहेर पडले. ते अद्याप घरी न परतल्याने ते हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. गोपिनाथ मामन चेलीकात्तील (रा.ग्रीनवुड इस्टेट, फेज-१, मु.हेदुटणे, ता.पनवेल) हे राहत्या घरातून गणपती मंदिरात जावून येतो असे सांगून घराबाहेर पडले आहेत. उंची ५ फूट २ इंच, रंग काळा, चेहरा उभट, अंगाने सडपातळ, नाक बसके, केस बारीक पांढरे, डोळे काळे असून अंगात पांढर्या रंगाचा फुल बाह्याचा शर्ट त्यावर निळ्या रंगाची बारीक लाईन असलेला व चॉकलेटी रंगाची फुल पॅन्ट, पायात काळ्या रंगाची स्लिपर, त्यांना मराठी, हिंदी व मल्याळ्म भाषा अवगत आहे. तसेच विसरण्याची सवय आहे. या वृद्ध इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२४४४ किंवा सहा. पो.उपनिरीक्षक मनोहर चव्हाण यांच्याशी संपर्क साधावा.

# जिल्हा वाहतुक शाखा, रायगड आणि रायगड रायडर्स यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान २०२१चा समारोप

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हा वाहतुक शाखा, रायगड आणि रायगड रायडर्स यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान २०२१ समारोप कार्यक्रम म्हणुन रस्ता सुरक्षा संबंधी जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने बाईक रॅलीचे अलिबाग शहर येथे आयोजित करण्यात आले होते.सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून मा. जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी मॅडम, पोलीस अधीक्षक श्री.अशोक दुधे सर हजर होते.



मा.जिल्हाधिकारी रायगड यांनी रस्ता सुरक्षा अभियानबाबत जनजागृती करण्याचे व त्या सोबत रायगड जिल्हयातील पर्यटन स्थळांबाबत, विविध खादय पदार्थांबाबत प्रसिध्दी देवुन जास्तीत जास्त पर्यटकांनी सुरक्षित पद्धतीने रायगड जिल्ह्यात यावेत याबाबत प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

मा.पोलीस अधीक्षक रायगड श्री.अशोक दुधे यांनी रस्ता सुरक्षा अभियानाचे महत्व अधोरेखित करून वर्षभर सर्व वाहन चालक, पर्यटक यांनी वाहन चालविताना सुरक्षिततेबाबत सर्तक राहण्याची आवश्यकता असल्याचे तसेच रस्त्यावरील अपघात कमीतकमी होण्यासाठी रायगड पोलीस दल सदैव प्रयत्नशिल असल्याचे प्रतिपादन केले.तसेच रस्ता सुरक्षा संबंधीत प्रबोधन केले. मा.जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांच्या हस्ते सदर बाईक रॅलीचे हिरवा झेंडा दाखवुन शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर सदर बाईक रॅलीत साधारण ३० बाईक रायडर्स रस्त्याचे नियम व सुरक्षिततेचे पालन करून अलिबाग शहरात मार्गस्थ झाले.त्यानंतर अलिबाग शहर बीच येथेरॅलीची सांगता झाली.

# यतीन देशमुख यांची मनसे पनवेल-नविन पनवेल शहर अध्यक्षपदी नेमणूक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आज राज ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि नितीन सरदेसाई तसेच शिरीष सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हाध्यक्ष अतुल भगत यांच्या प्रयत्नाने यतीन देशमुख यांची मनसे पनवेल व नविन पनवेल शहराच्या अध्यक्ष पदी नेमणूक करण्यात आली आहे.

या नेमणुकीचे पत्र पक्षप्रमुख राज ठाकरे यांच्या हस्ते त्यांना देण्यात आले. यावेळी यतीन देशमुख यांनी मनसेची ध्येय धोरणे व कार्यक्रम इत्यादी वेळोवेळी आपल्या क्षेत्रात निष्ठेने राबवावी. सदर नेमणूक ही एक वर्षाच्या कालावधीची असून आपल्या पदाचा कार्यअहवाल पाहूनच पुढील मुदत वाढ संदर्भात निर्णय घेतला जाईल आदी विषय त्यांच्या नेमणुकी पत्रकात लिहिण्यात आले आ-हेत. तरुण कार्यकर्त्याला एवढी मोठी जबाबदारी मिळाल्याबद्दल कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# कोकण भवनात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आज कोकण भवन येथे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

आद्य पत्रकार, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा राज्य सरकारने थोर पुरूषांच्या यादीत समावेश केला आहे. २० फेब्रुवारी २०२१ रोजी बाळशास्त्री जांभेकरांची २०९ वी जयंती प्रथमच राज्यभर शासकीय स्तरावर साजरी केली जात आहे. बाळशास्त्री जांभेकरांचा थोर व्यक्तीच्या यादीत समावेश करून त्यांची जयंती साजरी करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल राज्यभरातील सर्व मराठी पत्रकार संघटनांनी शासनाला धन्यवाद दिले आहेत. बाळशास्त्री जांभेकर यांची जन्मतारीख कोणती याबद्दल विविध मतप्रवाह होते. ११ फेब्रुवारी रोजी शासनाने शुध्दीपत्रक काढून २० फेब्रुवारी रोजी शासकीय, निमशासकीय कार्यालयात बाळशास्त्रींची जयंती साजरी करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे यंदा प्रथमच राज्यात शासकीयस्तरावर बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी होत आहे. यावेळी श्रीमती माधुरी डोंगरे नायब तहसीलदार कोकण विभाग तसेच कोकण भवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# रायगड जिल्हा पत्रकार संघ, रायगड प्रेस क्लबतर्फे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघ आणि रायगड प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बाळशास्त्री जांभेकर यांचा प्रतिमेला उपाध्यक्ष नागेश कुळकर्णी, ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत रांजणकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन आदरांजली अर्पण करण्यात आली.

आद्य पत्रकार, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा राज्य सरकारने थोर पुरूषांच्या यादीत समावेश केला आहे. २० फेब्रुवारी २०२१ रोजी बाळशास्त्री जांभेकरांची २०९ वी जयंती प्रथमच राज्यभर शासकीय स्तरावर साजरी केली जात आहे. बाळशास्त्री जांभेकर यांची जन्मतारीख कोणती याबद्दल विविध मतप्रवाह होते. ११ फेब्रुवारी रोजी शासनाने शुध्दीपत्रक काढून २० फेब्रुवारी रोजी शासकीय, निमशासकीय कार्यालयात बाळशास्त्रींची जयंती साजरी करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे यंदा प्रथमच राज्यात शासकीयस्तरावर बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी होत आहे. यावेळी ज्येष्ठ पत्रकार नारायण मेकडे यांच्या निधनाबद्दल त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी बळवंत वालेकर, नागेश कुळकर्णी यांनी स्व मेकडे यांच्या आठवणींना उजाळा दिला. रायगड प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल भारत रांजणकर यांचा यावेळी रायगड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने नागेश कुळकर्णी, बळवंत वालेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अलिबागचे नगरसेवक उमेश पवार, महेंद्र दुसार, माजी नगरसेवक आर के घरत, अलिबाग प्रेस असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रमोद जाधव, सरचिटणीस समीर मालोदे, उल्हास पवार, हेमकांत सोनार उपस्थित होते.



# कामगार उपायुक्त कार्यालयासमोरील गणेश कांबळेचे आमरण उपोषण स्थगित

### अप्पर कामगार आयुक्तांनी घेतली दखल

**दै.रायगड नगरी । तळोजा**

गणेश कांबळे या पीडित कामगाराने १६ फेब्रुवारी रोजी असाही इंडिया ग्लास लिमिटेड कंपनी आणि चक्क कामगार उपायुक्त कार्यालयाच्य प्रशासनाविरोधात पुकारलेल्या या आमरण उपोषणाची दखल वरिष्ठ स्तरावर थेट अप्पर कामगार आयुक्त शिरीन लोखंडे यांनी घेतल्याने हे उपोषण स्थगित करण्यात आले आहे.

तळोजा एमआयडीसी मध्ये असणाऱ्या असाही इंडिया ग्लास लि. कंपनी व्यवस्थापनाने कोणतीही पर्वसूचना न देता केवळ जातीय द्वेषभावनेतून कामावरून काढून टाकल्यामुळे या कंपनीची तक्रार कामगार उपायुक्त कार्यालयाकडे तक्रार करण्यात आली होती परंतू कामगार उपायुक्त कार्यालयाचे प्रशासनानेदेखील कंपनीला पाठीशी घालण्याचा प्रकार करीत असल्याच्या निषेधार्थ गणेश कांबळे या पीडित कामगाराने खांदा कॉलनी पनवेल येथील कामगार उपयुक्त कार्यालयासमोर १६ फेब्रुवारी रोजी आमरण उपोषण पुकारले परंतू या उपोषणाची दखल वरिष्ठ स्तरावर अप्पर कामगार आयुक्तांनी घेतल्याने सदरील उपोषण स्थगित करण्यात यावे असे पत्र रायगड विभागातील कामगार उपायुक्त प्रदीप पवार यांनी उपोषणकर्ते गणेश कांबळे आणि भीमशक्ती संघटनेचे पनवेल तालुकाध्यक्ष सुभाष गायकवाड यांना देण्यात आले.

यावेळी उपोषणकर्त्यांना लिंबू पाणी देऊन उपोषण स्थगित करण्याचे अपर उपआयुक्त शिरीन लोखंडे यांच्या आदेशाचे पत्र देण्यात आले असून त्यांनी या प्रकरणाची सुनावणी मुंबई येथील कामगार आयुक्त कार्यालय येथील कामगार भवन, बांद्रा याठिकाणी २२ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वा. ठेवण्यात आली आहे. त्यामुळे आता या सुनावणी कडे सर्वांचेच लक्ष लागून राहिलेले आहे.

# राज्यस्तरीय शिवगान २०२१ स्पर्धा राज्य स्पर्धेत रायगड जिल्हयाने पटकाविले 'विजेतेपद किताब'

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक प्रकोष्ठच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'राज्यस्तरीय शिवगान २०२१' स्पर्धेत उत्तर रायगड जिल्ह्याने सांघिक स्पर्धेत 'विजेतेपद किताब' पटकाविले. तसेच प्राथमिक फेरीच्या उत्कृष्ट नियोजनाचा प्रथम क्रमांकचे पारितोषिकही पटकवून उत्तर रायगड जिल्हयाने महाराष्ट्रात अव्वल क्रमांकाची अभिमानास्पद कामगिरी केली आहे.

सामगंध कला केंद्र पनवेल यांनी सांघिक गटात सातारा येथे झालेल्या अंतिम फेरीत उत्तर रायगड जिल्ह्याचे नेतृत्व केले. या संघाने स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांना भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, खासदार छ. श्रीमंत उदयनराजे भोसले, सांस्कृतिक सेलचे प्रदेश अध्यक्ष शैलेश गोजमगुंडे, प्रदेश प्रभारी लक्ष्मण सावजी आदी मान्यवरांच्या हस्ते ०१ लाख रुपये, सन्मानचिन्ह देऊन सन्मानित केले. यावेळी प्रदेश सदस्य सुनिल सिन्हा, कोकण संयोजक राहुल वैद्य, सहसंयोजक दीपक पवार, आदी उपस्थित होते. सांघिक प्रथम पारितोषिक सामगंध कला केंद्राच्या टीमने तर उत्कृष्ठ नियोजनाचा पुरस्कार सांस्कृतिक सेलचे उत्तर रायगड जिल्हा संयोजक अभिषेक पटवर्धन, पनवेल सहसंयोजक गणेश जगताप, संजीव कुलकर्णी यांनी स्विकारला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पोवाडा, पाळणा, शिवस्फूर्तिगीत, आरती, ओवी, ललकारी,अभंग, आदी प्रकारच्या गीतांचा समावेश असलेल्या या स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र प्रदेश भाजपा सांस्कृतिक सेल प्रदेशाध्यक्ष शैलेश गोजमगुंडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. या स्पर्धेत उत्तर रायगड जिल्ह्याकडून चमकदार कामगिरी व्हावी, यासाठी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शखाली उत्तर रायगड जिल्हा प्राथमिक फेरी स्पर्धा पार पडली होती. त्यामधून सांघिक गीत गायन स्पर्धेत सामगंध कला केंद्र पनवेलने प्रथम क्रमांक पटकाविला होता. १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनी सातारा येथील झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत सामगंध कला केंद्र पनवेलने सांघिक गटातून उत्तर रायगड जिल्ह्याचे नेतृत्व केले. उत्तम सादरीकरण करून रायगडच्या संघाने राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला, त्यामुळे रायगडच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.



**संपूर्ण महाराष्ट्रातून उत्तर रायगड जिल्ह्याला उत्तम स्पर्धा नियोजनाचे पाहिले पारितोषिक**

राज्यस्तरीय स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्राथमिक फेरीसाठी बक्षिसे तसेच उत्तम नियोजन केले होते. त्यामुळे प्राथमिक फेरीच्या उत्तम नियोजनाबद्दलचा प्रथम क्रमांकाचे बक्षिसही उत्तर रायगड जिल्ह्याने पटकाविले.

उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, कोकण संयोजक राहुल वैद्य यांनी आम्हाला स्पर्धेसाठी प्रोत्साहन दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर रायगड जिल्ह्याने चमकदार कामगिरी केली, त्यांचे तसेच उत्तर रायगड व पनवेल सांस्कृतिक सेलचे सर्व पदाधिकारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार.

**- अभिषेक पटवर्धन - संयोजक, उत्तर रायगड जिल्हा, सांस्कृतिक सेल**

# ऐतिहासिक वारसा ठरणार सौंदर्याचा आरसा ; पनवेलच्या वडाळे तलावाचे होत आहे सौंदर्यीकरण

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल** : पनवेलचा मरीन ड्राइव्ह अशी ओळख अस-लेला वडाळे तलाव आता आणखी सजणार आहे . त्याला सजवण्यासाठी पनवेल महापालिकेने निविदा मंजूर करून संबंधित कंपनीला कार्यादेश देखील देण्यात आले आहेत. या तलावाच्या परिसरात सभोवताली दगडी भिंत, विसर्जन घाट, खाद्य पदार्थांची आणि आणखी काही दुकाने , कारंजी , पार्किंग झोन, जेट्टी, बोटिंगची व्यवस्था, प्लॅटफॉर्म, असणार आहेत.अशी माहीती महानगरपालिकेतील एक अधिकारी यांनी बोलताना दिली



पनवेल मधील मुंबई पुणे महामार्गच्या पश्चिमेकडे वडाळे तलाव आहे, हे पनवेल शहराच्या मध्यभागी सर्वात मोठे, प्राचीन आणि नैसर्गिक तलाव आहे. हा तलाव सुमारे ३० एकरांवर पसरलेला आहे आणि शहराच्या मध्यभागी सर्वात मोठी खुली जागा आहे. पनवेलचा वडाळे तलाव एक ऐतिहासिक वारसा जपलेला तलाव. पानवेली आणि कमळाच्या फुलांनी अप्रतिम सौन्दर्य तलावाला लाभले . त्यामुळे हा तलाव पनवेलची शान म्हणून ओळखू लागला. या तलावाचे पाणी साधारण १,०७,७९१ चौ. मी पसरले आहे तर परिसर १.५२ किमी आहे. या तलावाचा गणपती वि सर्जनासाठी वापर केला जात आहे. तलावाच्या दक्षिण-पश्चिम किनार्यावर जुने मंदिर आहे आणि त्या मंदिराव्यतिरिक्त विसर्जन टाकी देखील आहे.तलावाच्या उत्तर बाजूस शिरस्त्राण आहे. पश्चिमेकडील किनार्यावर तलावाच्या किनार्यावर एक ऐतिहासिक अशोक बाग आहे या बागेच्या अलीकडे एक मोठा इन्ट्री पॉईन्ट (प्रवेशद्वार) ठेवावा अशी मागणी परीसरातुन होत आहे जेणेकरून जेष्ठ नागरीकांना तलावाला फेरफटका मारण्याकरीता व्ही.के हायस्कूल अथवा लाबचा पल्ला ठरलेले इन्ट्री पॉईन्ट कडे जावे लागणार नाही.

या तलावामध्ये शहर पातळीवरील मनोरंजनाची जागा म्हणून विकसित होण्याची क्षमता आहे जेथे लोक विश्रांतीसाठी आणि निसर्गाचा आनंद घेण्यासाठी येऊ शकतात. त्यासाठी महापालिकेकडून हे तलाव सुशोभित केले जातेय. या तलावाच्या सभोवताली दगडी भिंत बांधण्यात येत आहे . तर नागरिकांना सकाळी संध्याकाळी चालण्यासाठी साडे चार मीटर रुंद पाथ वे देखील उभारण्यात येत आहे. हा पाथ वे दगडी आहे. तसेच विसर्जन घाट देखील विकसित केला जाणार आहे .

या घाटाला ग्रेनाईटने सजवले जाणार आहे. या तला-वाचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच तलावावर चौपाटीवर असल्याचा भास होईल यासाठी १० खाद्य पदार्थांची आणि आणखी काही दुकाने असणार आहेत. याशिवाय फिरायला आले की वाहने पार्क करण्यास अडथळा येऊ नये यासाठी पार्किंग झोन देखील तयार करण्यात येत आहे. या झोनमध्ये ६४ चार चाकी आणि १६० दुचाकी वाहने पार्क करता येणार आहेत. या तलावाला १२ मीटर लांब आणि साडे चार मीटर रुंद जेट्टी देखील बांधण्यात येणार आहे. या तलावात बोटिंगची देखील व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी ४ सीटर आणि ६ सीटर बोटी कार्यन्वित असणार आहेत. १४ उडणारी कारंजी देखील या तलावात असतील. तलावातील दृश्य पाहण्यासाठी ११ प्लॅटफॉर्म देखील उभारण्यात येतील. या तलावाला बंदिस्त करण्यात येणार असून त्यासाठी २ प्रवेश द्वार आणि २ सुरक्षा केबिन देखील बसवण्यात येणार आहे. हे काम मे. डेल्ट टेक्स कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्या १० कोटी ७४ लाख रुपयांना देण्यात आले आहे.

पण हे सर्व नागरिकांना तिकिट घेऊन पाहावे लागणार आहे. या तलावाचे काम पूर्ण झाले की पनवेलच्या सौन्दर्यात आणखी मानाचा तुरा रोवला जाणार असल्याचे बोलले जात आहे मोठा तलावाचा परीघ असल्याने आता या ठिकाणी पहाटे व सायंकाळी जेष्ठ तसेच तरूणाई फेरफटका मारताना दिसत असतात संबधीत ठेकेदार यांनी फुटपाथावर काही ठिकाणी गटारावरील झाकणे बसविली नसल्याने चालत असलेल्या पादचारी यांना धोका संभावित असल्याने महानगरपालिकेने संबधीत विभागातुन तशा ठेकेदाराला सुचना कराव्यात जेणेकरून पुढील अनर्थ टळु शकेल एवढे माञ नक्की.